# सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेतर्फे राज्य शासनाने सेवा हमी कायदा २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या पुढीलप्रमाणे तक्ता अ मधे नमूद केलेल्या सेवा या **rts.solapurcorporation.org** व **aaplesarkar.maharashtra.gov.in** संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेल्या आहेत.

**तक्ता अ**

| अ.क्र. | सेवेचे नांव | कामाची मुदत<br>आवश्यक कागदपत्रे | ऑनलाईन बाबत कार्यपध्दती |
|---|---|---|---|
| १ | जनन दाखला | 3 दिवस | सन १९९१ पासूनचे जनन दाखले हे www.solapurcorporation.org या संकेतस्थळावर “जनन नोंदणी शोध” या लिंकमधे नोंद शोधता येणार असून नोंदीचा क्रमांक हा rts.solapurcorporation.org मधे जनन दाखला या सेवेखाली अर्ज करताना नोंदीचा क्रमांक टाकल्यानंतर जितक्या प्रतींची मागणी केलेली आहे तितके पैसे नागरिकांनी ऑनलाईन भरावयाचे आहेत. तद् नंतर सदर अर्जाप्रमाणे महापालिकेकडून नागरिकांच्या Log in मधे दाखला Load केला जाईल जेणेकरुन नागरिकांना त्याची प्रिंट काढून घेता येईल. |
| 2 | मयत दाखला | 3 दिवस | सन २०११ पासूनचे मयत दाखले हे वरील अ.क्र. १ मधे नमूद कार्यपध्दतीनुसार नागरिकांना काढता येतील. |
| ३ | मालमत्ता कर उतारा | 3 दिवस | नागरिकांना www.solapurcorporation.org या portal वरुन “आपले मालमत्ता देय पहा” या लिंकमधे मिळकतीचा नंबर शोधता येईल किंवा नागरिकांकडे असणाऱ्या मिळकत बिलावर देखील मिळकत क्रमांक उपलब्ध आहे. सदर मिळकत क्रमांक नोंदवून नागरिकांना ऑनलाईन अर्ज करता येईल. किती प्रती अपेक्षित आहेत त्याप्रमाणे नागरिकांना ऑनलाईन पैसे भरावे लागतील. नागरिकांच्या Log in मधे उतारा Load केला जाईल जेणेकरुन नागरिकांना त्याची प्रिंट काढून घेता येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | थकबाकी नसल्याचा दाखला | ३ दिवस | याची कार्यपध्दती अ.क्र. ३ प्रमाणेच राहिल |
| ५ | वारसा हक्काने मिळकतीचे हस्तांतरण नोंद | 15 दिवस<br>1)थकबाकी नसल्याचा दाखला<br>2)वारसाहक्क प्रमाणपत्र | मिळकत क्रमांक नोंदवून नागरिकांना ऑनलाईन अर्ज करता येईल. आवश्यक ती कागदपत्रे नागरिकांना scan करुन upload करावी लागतील. तद् नंतर संबंधित खात्यांकडून मूळ कागदपत्रांची तपासणी झालेनंतर हस्तांतरण प्रमाणपत्र नागरिकांच्या Log in मधे Load केले जाईल जेणेकरुन नागरिकांना त्याची प्रिंट काढून घेता येईल. |
| ६ | वारसा हक्काव्यतिरिक्त इतर कारणाने मिळकतीचे हस्तांतरण नोंद | 15 दिवस<br>१)थकबाकी नसल्याचा दाखला<br>२)दस्तऐवजाची प्रत(खरेदी खत/ बक्षीसपत्र/ वाटणीपत्र व इतर) | याची कार्यपध्दती वरील अ.क्र. ५ प्रमाणेच राहिल. |
| ७ | बांधकाम परवानगी | 60 दिवस<br>1)प्रॉपर्टी उतारा ( मूळ प्रत ) ६ महिन्याच्या आतील<br>2)इंडेक्स मूळ प्रत<br>3) सनद मूळ प्रत<br>4) मंजूर लेआउट प्रत<br>5)चालू कर आकारणी ना हरकत दाखला<br>6)प्रतिज्ञा व हमीपत्र<br>7) शहर सुधारणा ना हरकत दाखला<br>8) नकाशे प्रती - चार<br>9)लायसन्स आर्किटेक्ट/इंजिनियर /सुपरवायजर-१ व २ यांचे लायसन्सचे झेरॉक्स प्रत | नागरिकांना ऑनलाईन अर्ज करता येईल. आवश्यक ती कागदपत्रे scan करुन upload करावी लागतील. तद् नंतर संबंधित खात्याकडून जागेवर जाऊन तपासणी झालेनंतर व मूळ कागदपत्रांची पडताळणी झालेनंतर नागरिकांना भराव्या लागणाऱ्या फी बाबत Letter of Intimation दिले जाईल व नागरिकांनी पैसे भरले नंतर बांधकाम परवानगीची प्रत नागरिकांच्या Log in मधे Load केली जाईल जेणेकरुन नागरिकांना त्याची प्रिंट काढून घेता येईल. |
| ८ | भोगवटा प्रमाणपत्र | 30 दिवस<br>1)बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>2)जोते प्रमाणपत्र | अ.क्र. ७ प्रमाणेच कार्यपध्दती राहिल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 3)घरमालक/वास्तुविशारद यांचे पुर्णत्वाचे स्वयंघोषणा पत्र | |
| ९ | जोते प्रमाणपत्र | 15 दिवस<br>1)बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | अ.क्र. ७ प्रमाणेच कार्यपध्दती राहिल. |
| १० | भाग नकाशा | 3 दिवस<br>1)7/12उतारा/सीटीसर्व्हे उतारा<br>2)मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | अ.क्र. ७ प्रमाणेच कार्यपध्दती राहिल. |
| ११ | झोन प्रमाणपत्र | 7 दिवस<br>12)7/12उतारा/सिटीसर्व्हे उतारा<br>2)मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | अ.क्र. ७ प्रमाणेच कार्यपध्दती राहिल. |
| १२ | नळजोडणी देणे | 15 दिवस<br>1) जागा मालकी कागदपत्रे<br>2) थकबाकी नसल्याचा दाखला<br>3) स्थळ दर्शक नकाशा | नागरिकांना ऑनलाईन अर्ज करता येईल. आवश्यक ती कागदपत्रे scan करुन upload करावी लागतील. तद् नंतर संबंधित खात्याकडून जागेवर जाऊन तपासणी झालेनंतर व मूळ कागदपत्रांची पडताळणी झालेनंतर नागरिकांना भराव्या लागणाऱ्या फी बाबत Letter of Intimation दिले जाईल व नागरिकांना पैसे भरले नंतर नळ जोडणी केली जाईल. |
| १३ | जलनित्सारण जोडणी देणे | 15 दिवस<br>1) जागा मालकी कागदपत्रे<br>2) थकबाकी नसल्याचा दाखला | अ.क्र. १२ प्रमाणेच कार्यपध्दती राहिल |
| १४ | अग्निशामक ना हरकत दाखला देणे | 7 दिवस<br>1)थकबाकी नसल्याचा दाखला<br>2) लायसन्स आर्किटेक्ट/इंजिनियर यांचा अर्ज<br>3)आग प्रतिबंधक उपाययोजनांबाबतची रुपरेषा<br>4)कॅपिटेशन फि | अ.क्र. १२ प्रमाणेच कार्यपध्दती राहिल |
| १५ | विवाह प्रमाणपत्र | 3 दिवस | सदर विवाहपत्राची नोंद संगणकावरच केलेली असल्यास प्रत काढून घेण्याची सुविधा आहे. |

आयुक्त
सोलापूर महानगरपालिका